www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर १

# महाराष्ट्र टाइम्स

पुणे । शुक्रवार, ३ मे २०१९ । पाने २४ (पुणे प्लस व विशेष पुरवणीसह) । शहर आवृत्ती । ₹ ४.००

राजकारण? ज

# अनेक शाळांचे निकाल शंभर टक्के

## तेजस साबळे आणि मृण्मयी नेर्लीकरला मिळाले ९८ टक्के

म. टा. प्रतिनिधी, पुणे



> विखे पाटील मेमोरिअल शाळेतील उत्तीर्णांचे प्रमाण १०० टक्के असून, मृण्मयी नेर्लीकर हिने ९८ टक्के गुण प्राप्त केले आहेत. जय इंगळे याने ९५.८ टक्के गुण मिळवत दुसरा, तर अनन्या कर्णिक हिने ९५.६ टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळवला आहे.
>
> – अशोक विखे पाटील, विश्वस्त

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) बारावीच्या निकालात शहरातील शाळांनी बाजी मारली असून, अनेक नामांकित शाळांमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या निकालाचे प्रमाण १०० टक्के आहेत. ब्लॉसम शाळेच्या तेजस साबळेने आणि विखे पाटील मेममोरिअल शाळेच्या मृण्मयी नेर्लीकर हिने ९८ टक्के गुण प्राप्त केले आहे. तर, डीपीएस पुणेच्या शुभा मुखर्जीने, खडकीच्या आर्मी पब्लिक स्कूलमधील अनुष्का कृष्णा आणि बर्णिता बसंत यांनी ९७.८ टक्के गुण मिळवले आहे. योसोबतच विभू शर्माने ९७.६ टक्के गुण आणि संस्कृती शाळेच्या अदित देशपांडेने ९७.२ टक्के गुण मिळविले आहे. त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी विविध विषयांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळविले आहेत.

डीएव्ही शाळेतून २१४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी सर्वच उत्तीर्ण झाले आहे. विज्ञान शाखेतून शाळेतील स्नेहा सुभाष गोडुकुपीने ९७.६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष प्रवर्गातून ऋत्विक गोएलने वाणिज्य शाखेतून ८१.६ टक्के गुण प्राप्त केल्याची माहिती सी. व्ही. माधवी यांनी दिली. खडकीच्या आर्मी पब्लिक स्कूलमधील उत्तीर्णांचे प्रमाण १०० टक्के असून, विज्ञान शाखेतून विभू शर्माने ९७.६ टक्के गुण मिळवून पहिला, तर वाणिज्य शाखेतून सौरभ जाधवने ९६.४ टक्के गुण मिळवून दुसरा पटकावला. मानवविद्या शाखेतून अनुष्का कृष्णा आणि बर्णिता बसंत यांनी ९७.८ टक्के गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला आहे.

'सिटी इंटरनॅशनल स्कूल वानवडी शाळेतून उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के आहे. श्रेयस सहारे याने ९६.४ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. परीक्षेला बसलेल्या एकूण १९५ विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थी ९० टक्क्यांच्यावर गुण मिळवून गुणवत्ता यादीत आले असून, ७७ विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता श्रेणी मिळवली आहे. तसेच ६९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत,' अशी माहिती मौलिक दीक्षित यांनी दिली. 'अक्षरा इंटरनॅशनल स्कूलमधील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, चिराग हेगडे याने ९६.२० टक्के गुण मिळवत पहिला, मेधा भागवत हीने ९५.२० टक्के गुण मिळवत दुसरा आणि सुमंत्रक मुखर्जीने ९५ टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळवला,' अशी माहिती मुख्याध्यापिका सोनाली बालवटकर यांनी दिली. 'गोएलगंगा इंटरनॅशनल शाळेतून ११९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९ विद्यार्थ्यांना ९५ पेक्षा अधिक, तर ३२ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. विज्ञान शाखेतून दृष्टी पेशवानी हीने ९६. ८ टक्के गुण मिळवत पहिला क्रमांक पटकावला आहे.

'द ऑर्बिस प्रशालेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रशालेमध्ये २४ टक्के विद्यार्थ्यांनी ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. विज्ञान शाखेतून हिमांशु कोरडे याने ९५.२ टक्के गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला. मानवविद्या शाखेतून राशी सिंहने ८९ टक्के, अभिलाषा रावतने ८८.४ टक्के गुण मिळवले,' अशी माहिती उपमुख्याध्यापिका शारदा राव यांनी दिली. इंदिरा नॅशनल स्कूलमधील अंकिता जगती ९५.४ टक्के गुण मिळवून पहिली आली. 'संस्कृती शाळेतून उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के असून, शाळेच्या सिद्धार्थ मुंगळे आणि स्नेहल कौशल या दोन विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेसोबतच संगीताच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यश मिळवले आहे,' अशी माहिती देवयानी मुंगळी यांनी दिली. दिघीच्या आर्मी पब्लिक स्कूलमधील साहिल मोहितेने ९४.४ टक्के गुण मिळवत विज्ञान शाखेतून प्रथम येण्याचा मान पटकावला.